
दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे
बीड/महाराष्ट्र | मंगळवार दि.२६ नोव्हेंबर २०२४ | आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक -९२ | पाने ४ | किंमत ४ रुपये



भारतीय संविधान दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..
–संपादक

# विधानसभा निवडणुकीनंतर विधानपरिषदेच्या ६ जागा रिक्त

## नाराजांची वर्णी लागण्याची शक्यता,महायुती कोणाला देणार संधी?

**मुंबई (वृत्तसंस्था)**–विधानसभा निवडणुकीत महायुतीला घवघवीत यश मिळाले आहे. महायुतीने २३० जागांवर विजय मिळवत बहुमताचा आकडा देखील पार केला आहे. भाजप, शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीने विधानपरिषदेवरील आमदारांना विधानसभेच्या रिंगणात उतरवले होते. त्या सर्वांचा विजय झाल्यामुळे विधानपरिषदेच्या ६ जागा रिक्त झाल्या आहेत. त्यामुळे आता विधानसभा निवडणुकीनंतर महायुतीच्या ६ नेत्यांची विधान परिषदेवर वर्णी लागणार आहे.यंदाच्या विधानसभा निवडणुकीत अनेकांना डावलून इतरांना उमेदवारी देण्यात आली होती. त्यामुळे अनेकांनी बंडखोरी केली. परंतु,काही ठिकाणी पक्ष श्रेष्ठींना बंडखोरी रोखण्यात यश आले. त्यामुळे निवडणुकीत ज्या नाराज नेत्यांना डावलण्यात आले होते,त्यांना आता विधानपरिषदेवर संधी दिली जाऊ शकते.

सध्या भाजपचे चंद्रशेखर बावनकुळे, गोपीचंद पडळकर, रमेश कराड आणि प्रविण दटके हे विधान परिषदेवर असलेले नेते विधानसभा निवडणुकीत निवडून आले आहेत. त्यामुळे विधार परिषदेत भाजच्या ४ जागा रिक्त झाल्या आहेत. तर शिवसेनेचे आमशा पाडवी हे विधानसभेवर निवडून आल्यामुळे त्यांचीही एक जागा रिक्त झाली आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे राजेश विटेकर हे देखील विधानसभा निवडणुकीत विजयी झाल्यामुळे विधान परिषदेवर अजित पवार गटाची एका जागा रिक्त झाली.

विधान परिषदेवर रिक्त झालेल्या जागांमुळे विधानसभा निवडणुकीत तिकीट न मिळालेल्या नाराज नेत्याला संतुष्ट करण्याची संधी भाजप, शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीला मिळणार आहे. महायुतीचे तिन्ही घटकपक्ष नेमकं कोणाला संधी देणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.दरम्यान गेल्या महिन्यात विधानपरिषदेच्या १२ रिक्त जागांपैकी ६ जागांवर महायुतीच्या नेत्यांना संधी देण्यात आली आहे.यामध्ये भाजपकडून महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ पनवेलचे माजी महापौर विक्रांत पाटील, पोहरादेवीच्या गुरुगादीचे पीठाधीश धर्मगुरु बाबूसिंग महाराज राठोड यांना संधी देण्यात आली.शिवसेनेकडून हिंगोलीचे माजी खासदार हेमंत पाटील आणि मनीषा कायंदे यांना विधानपरिषदेवर पाठवण्यात आले.अजित पवारांच्या राष्ट्रवादीकडून मंत्री भुजबळ यांचे चिरंजीव पंकज भुजबळ आणि सांगलीचे माजी महापौर इद्रिस नायकवडी यांची वर्णी लागली होती.



# शरद पवारांच्या राष्ट्रवादीला तुतारी सदृश्य चिन्हामुळे जिंतूर, घनसावंगीसह ९ जागांवर फटका

**जालना । असलम कुरेशी**

राज्यात विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठे बहुमत मिळाले आहे. निकालानंतर आता महायुतीमध्ये सत्तास्थापनेसाठी हालचाली वाढल्या आहेत.

मुख्यमंत्रिपद कोणाकडे द्यावे, याबाबत महायुतीतील मित्रपत्रांमध्ये चर्चा चालू आहे. तर दुसरीकडे राज्यातील जनतेने महाविकास आघाडीकडे पाठ फिरवलीआहे.

शरद पवार, उद्धव ठाकरे तसेच काँग्रेसला जनतेने नाकारले आहे. दरम्यान, या निवडणुकीतील निकालाचे विश्लेषण केले जात असताना अचंबित करणाऱ्या बाबी समोर येत आहेत. ताज्या अभ्यासानुसार तुतारी (ट्रम्पेट) या निवडणूक चिन्हामुळे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला जवळपास ९ जागांवर फटका बसला आहे.

विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या पक्षाचे निवडणूक चिन्ह तुतारी वाजवणारा माणूस असे होते. याच निवडणुकीत अनेक जागांवर तुतारी (ट्रम्पेट) असे चिन्ह असलेले उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे होते. तुतारी या नावामुळे अनेक जागांवर शरद पवार यांच्या पक्षाला फटका बसू शकतो, असा अंदाज व्यक्त केला जात होता. त्याची प्रचीती आता आली आहे. शरद पवार यांच्या पक्षाला या निवडणुकीत एकूण नऊ जागांवर फटका बसला आहे. या निवडणूकीत तुतारीला




मिळणारी मते जर शरद पवार यांच्या पक्षाला मिळाली असती तर या नऊ जागांवर राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षाचे उमेदवार विजयी झाले असते, असे बोलले जात आहे. जिंतूर, घनसावंगी, शहापूर, बेलापूर, अणुशक्तीनगर, आंबेगाव, पारनेर, केज, परंडा या जागांवर शरद पवार यांच्या पक्षाच्या उमेदवाराचा जेवढ्या मतांनी पराभव झाला आहे, त्यापेक्षा अधिक मते तुतारी हे निवडणूक चिन्ह असलेल्या उमेदवारांना मिळाली आहेत. परभणी जिल्ह्यात शरद पवार यांच्या पक्षाचे विजय भांबळे यांचा पराभव झाला. या मतदारसंघात भांबळे यांना ४ हजार ५१६ मते कमी पडली. तर तुतारी म्हणजेच ट्रम्पेटला ७ हजार ४३० मते मिळाली. घनसावंगी मतदार संघात राजेश टोपे यांचा २ हजार ३०९ मतांनी पराभव झाला. येथे ट्रम्पेट या चिन्हाला ४ हजार ८३० मते मिळाली. शहापूर येथे शरद पवार यांच्या पक्षाचे पांडुरंग बरोरा यांचा १ हजार ६७२ मतांनी पराभव झाला. येथे ट्रम्पेटला ३ हजार ८९२ मते मिळाली. बेलापूरमध्ये शरद पवार यांच्या पक्षाचे संदीप नाईक यांचा अवघ्या ३७७ मतांनी पराभव झाला. तर येथे ट्रम्पेटला २ हजार ८६० मते मिळाली. अणुशक्तीनगर येथे फहाद अहमद यांचा ३ हजार ३७८ मतांनी पराभव झाला. तर येथे तुतारीला एकूण ४ हजार ७५ मते मिळाली. आंबेगाव या जागेवर शरद पवार यांच्या पक्षाचे देवदत्त निकम यांचा १ हजार ५२३ मतांनी पराभव झाला. येथे तुतारी म्हणजेच ट्रम्पेट या निवडणूक चिन्ह असलेल्या उमेदवाराला २ हजार ९६५ मते मिळाली. पारनेर या जागेवर शरद पवार यांच्या पक्षाच्या राणी लंके यांचा १ हजार ५२६ मतांनी पराभव झाला. येथे ट्रम्पेटला ३ हजार ५८२ मते मिळाली. केज मतदारसंघात शरद पवार यांच्या पक्षाचे पृथ्वीराज साठे यांचा २ हजार ६८७ मतांनी पराभव झाला. दुसरीकडे याच मतदारसंघात ट्रम्पेटला ३ हजार ५५९ मते मिळाली. परंडा या जागेवर राहुल मोटे यांचा १ हजार ५०९ मतांनी पराभव झाला. दुसरीकडे याच मतदारसंघात ट्रम्पेटला ४ हजार ४४६ मते मिळाली. दरम्यान, लोकसभा निवडणुकीतही सातारा तसेच इतर लोकसभा मतदारसंघात ट्रम्पेट या निवडणूक चिन्हामुळे शरद पवार यांच्या पक्षाच्या उमेदवाराचा पराभव झाला होता. त्याचीच प्रचिती आता यावेळच्या विधानसभा निवडणुकीतही आली आहे.

# मी जरी विजयी झालो नसलो तरी जनतेच्या कामा साठी सदैव तत्पर राहणार-माजी मंत्री राजेश टोपे

## जायकवाडी धरणातून डाव्या कालव्याद्वारे शेतीसाठी पाणी सोडा

**जालना । असलम कुरेशी**

मी जरी विजयी झालो नसलो तरी जनतेच्या कामासाठी सदैव तत्पर राहणार असल्याने शेतकऱ्यांनी केलेल्या मागणीनुसार माजी मंत्री राजेशभैय्या टोपे यांनी जायकवाडी धरणातून डाव्या कालव्याद्वारे शेतकरी बांधवांची गरज लक्षात घेऊन शेतीसाठी पाणी सोडणे बाबत कडाचे अधीक्षक अभियंता एस.के. सब्बीनवार यांच्याशी दूरध्वनीद्वारे विनंती केली.

जायकवाडी धरणातून आज दिनांक २५ नोव्हेंबर सोमवार रोजी संध्याकाळी पाणी सोडण्यात येणार असल्याचे कडाचे अधीक्षक अभियंता एस.के. सब्बीनवार यांनी सांगितले. शेतकरी बांधवांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा असे आवाहन माजी मंत्री राजेशभैय्या टोपे यांनी केले आहे.



# शिंदेंसोबत गुवाहाटीला गेलेले ५ आमदार पराभूत

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना शिंदे पक्षाचे गुवाहाटीला गेलेले पाच आमदार पराभूत झाले आहेत. दरम्यान, विधानसभा निवडणुकीत शिंदे यांच्यासोबत गुवाहाटीला गेलेले सर्व निवडून आणले नाही, तर राजकारणातून निवृत्ती घेऊ असे म्हणले होते. पराभूत आमदारांमध्ये सदा सरवणकर, यामिनी जाधव, शहाजीबापू पाटील, संजय रायमूलकर आणि ज्ञानराच चौगुले यांचा समावेश आहे.माहीममध्ये सदा सरवणकर यांचा तिरंगी लढतीत पराभव झाला. शहाजीबापू पाटील यांना सांगोल्यात शेतकरी कामगार पक्षाकडून पराभव स्वीकारावा लागला. भायखळ्यातून यामिनी जाधव पराभूत झाल्या. बुलढाण्यातून संजय रायमूलकर यांचा पराभव झाला. उमरग्यामध्ये ज्ञानराज चौगुले यांचा पराभव झाला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेले आव्हान खोटे ठरले असल्याचे दिसत आहे.




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जून २०२२ मध्ये शिवसेनेत बंडखोरी केली होती. ते शिवसेना आणि अपक्ष असे ५० आमदार सोबत घेऊन बाहेर पडले होते. त्यामुळे उद्धव ठाकरेंचे सरकार पडले होते. एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर भाजपसोबत सत्ता स्थापन केली होती. उद्धव ठाकरे यांच्याकडील धनुष्यबाण हे चिन्हही निवडणूक आयोगाने त्यांना दिले होते. विधानसभा निवडणुकीत बंडखोरांमधील एकही आमदार निवडून येणार नाही, असा दावा शिवसेनेच्या नेत्यांकडून केला जात होता. पण हा दावा आता फोल होताना दिसत आहे.त्यावेळी झालेल्या विधानसभेच्या अधिवेशनात मुख्यमंत्री झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी आपले पहिले भाषण केले होते. आमचा ५० मधला एकही आमदार आम्ही पडू देणार नाही. तसेच भाजपचेही ११५ आमदार मिळून आम्ही २०० चा आकडा पार करू. हा सभागृहात शब्द आहे आणि तसे नाही केले, तर गावाला शेती करायला जाईन, असे एकनाथ शिंदे म्हणाले होते. आता शिंदेंच्या शिवसेनेने ५५ जागांवर आघाडी घेत आपला स्ट्राईक रेट वाढविला आहे. तसेच महायुतीचा आकडा २२० पेक्षा अधिक होताना दिसत आहे.

## तू आमदार कसा होतो तेच बघतो

# शरद पवार गटाच्या उमेदवाराचा पराभव,पवारांनी दिले होते आव्हान

**पुणे (वृत्तसंस्था)**–उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लोकसभा निवडणुकीच्यावेळी शिरूरचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते अशोक पवार यांना भरसभेत चॅलेंज दिले होते. तू आमदार कसा होतो तेच बघतो, मंत्री होतो काय? अशा शब्दांत थेट आव्हान अजित पवारांनी दिले होते. या विधानसभा निवडणुकीत शरद पवारांनी अशोक पवार यांना शिरूर येथून त्यांना उमेदवारी दिली होती.

या विधानसभा निवडणुकीत शरद पवार गटाच्या अशोक पवार यांच्या विरोधात शिरूर येथे अजित पवारांनी ज्ञानेश्वर कटके यांना उमेदवारी दिली होती. शिरूर विधानसभा मतदारसंघातून ज्ञानेश्वर कटके यांनी १९२२८१ एवढी मते मिळवत दणदणीत विजय मिळवला आहे. तसेच अशोक पवार यांना ११७७३१ मते मिळाली व पराभूत झाले. त्यामुळे अजित पवारांनी दिलेले आव्हान देखील पूर्ण केले असल्याची चर्चा सुरू आहे.लोकसभा निवडणुकीच्या



प्रचाराच्या वेळी अजित पवारांनी शिरूर लोकसभा मतदारसंघात जाहीर सभा घेतली होती. या सभेत बोलताना शरद पवार गटाचे शिरूरचे आमदार अशोक पवार यांना खुले आव्हान अजित पवारांनी दिले होते. आरे पठ्ठ्या तू आमदार कसा होतो तेच बघतो, मंत्री होतो काय?, अशा शब्दात आव्हान केले होते.पुढे अजित पवार म्हणाले होते, दिलीप वळसेंचा शपथविधी झाला आणि अशोक पवार यांची सटकली. ते म्हणाले, दादांनी दिलीप वळसे पाटलांना मंत्रिमंडळात घ्यायला नको होते. दादा एकटे जिल्ह्यातून गेले असते तरी आमची कामे झाली असती. त्यांच्या डाव्या आणि उजव्या हाताला कोण आमदार बसले होते. त्यांच्या कानात अशोक पवार यांनी असे सांगितले. आता अशोक पवार काय म्हणत होते ते मला त्या आमदाराने सांगितले. त्यानंतर अशोक पवार शरद पवार गटात गेले. त्यांना पवार साहेबांनी सांगितले की, पुढच्या वेळेस तुच मंत्री.आता पुढच्या वेळेस मंत्री होण्याकरता त्यांनी कारखान्याची वाट लावली आणि मंत्री व्हायला निघाले. आरे पठ्ठ्या तू आमदार कसा होतो तेच बघतो, मंत्री होतो काय? अजित पवारांनी एकदा मनावर घेतले तर मी आमदार होऊ देत नाही. आता मी पण चॅलेंज देतो तू आमदारच कसा होतो ते बघतो. मी लोकांना सांगेन की यांची खरी औकात काय आहे, अशा शब्दात अजित पवारांनी चॅलेंज दिले होते.



संपादकीय

# दारुबंदीची नशा

'दारू काय पिता? दूध प्या' असे आदर्शवादी आवाहन करत बिहारचे तत्कालीन मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी २ ऑक्टोबर, २०१६पासून राज्यात दारूबंदी लागू केली. बिहारमधील गुन्हेगारी कमी करणे, कौटुंबिक अत्याचाराच्या घटना नियंत्रणात आणणे आदी उदात्त हेतू ह्या घोषणेमागे होते. नितीश यांच्यावर असलेला गांधीवाद व समाजवादी विचारसरणीचा पगडाही या धोरणासाठी प्रेरक होता. मात्र हे धोरण लागू करण्यापूर्वी त्यासाठी आवश्यक असणारे वातावरण त्यांनी निर्माण केले होते का, कोणत्याही प्रकारचे मद्य उपलब्ध होऊ नये यासाठी आवश्यक ती प्रशासकीय सिद्धता केली होती का आदी प्रश्न उपस्थित व्हावेत अशी परिस्थिती सध्या बिहारमध्ये दिसत आहे. पैसेवाल्यांना सहज उपलब्ध होणारे उंची मद्य; लपूनछपून का होईना, परंतु कधीही मिळणारी गावठी व देशी दारू आणि पोलिस प्रशासनाचे त्यावर नसलेले नियंत्रण हे सर्व पाहता नितीश यांचे हे धोरण स्वप्नाळूच होते असे म्हणण्यास वाव आहे.

बिहार प्रोहिबिशन अँड एक्साइज अ‍ॅक्ट, २०१६द्वारे बिहारमध्ये दारूबंदी लागू करण्यात आली. या कायद्यानुसार राज्यात दारूचे उत्पादन, ने-आण, खरेदी-विक्री, साठा करणे यावर बंदी घालण्यात आली. या कायद्यांतर्गत प्रथम दोषी ठरल्यास तीन महिने तुरुंगवास व ५० हजार रुपये दंड या शिक्षेची तरतूद आहे. अधिक गंभीर गुन्ह्यांसाठी पाच ते दहा वर्षे तुरुंगवासाचीही तरतूद आहे. राज्यात दारूबंदी लागू केल्यानंतर आजवर नितीश कुमार हेच मुख्यमंत्रिपदी आहेत. कधी राष्ट्रीय जनता दल तर, कधी भारतीय जनता पक्षाशी युती करून त्यांनी मुख्यमंत्रिपद राखले आहे. त्यामुळे आपले हे महत्त्वाकांक्षी धोरण यशस्वी करण्याची जबाबदारी मुख्यत्वे त्यांचीच आहे. त्यासाठी त्यांना पुरेशी संधीही मिळाली. परंतु याविषयी सरकारकडून देण्यात येणारे आकडेच या धोरणाचे अपयशच दर्शवतात.

दारूबंदीनंतरच्या आठ वर्षांत बिहारमध्ये दोनशेहून अधिक जणांचा विषारी दारू पिऊन मृत्यू झाला आहे. हा सरकारी आकडा असल्याने खरा आकडा त्याहून अधिक असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कालावधीत ३.४६ कोटी लिटर मद्य जप्त करण्यात आले आहे. दारूबंदीचा कायदा या ना त्या कारणाने मोडल्याप्रकरणी ८.४३ लाख गुन्ह्यांची नोंद झाली आहे व १२.७ लाख जणांना अटक करण्यात आलेली आहे. अन्य राज्यांतून होणारी मद्यतस्करी ही तर नित्याचीच बाब झाली आहे. गेल्या आठवड्यात घडलेली घटना ही या धोरणासंदर्भातील आजवरची सर्वांत भीषण घटना आहे. सिवान व सारन या जिल्ह्यांत विषारी दारू प्यायल्याने ३५ जणांना प्राण गमवावे लागले, तर अनेकांची दृष्टी गेली. या जिल्ह्यांत काही ठिकाणी असलेल्या जत्रांमध्ये प्लास्टिकच्या पिशव्यांमधून ही दारू विकली जात होती असे समजते. हा सगळा चोरीचा मामला असल्याने कारवाईच्या भीतीपोटी अनेकांनी चोरूनच वैद्यकीय उपचार करून घेणे पसंत केले. त्यामुळे बळींचा आकडाही खरा नसावा. यातील मृतांच्या वारसांना सरकारने २५ लाख रुपयांची मदत घोषित केली आहे, तर दृष्टी गमावलेल्यांना दहा लाख रुपये देण्यात येणार आहेत.या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन नितीश यांनी दिले आहे. परंतु हे प्रकार रोखण्यासाठी कोणते ठोस उपाय करता येतील यावर सरकार विचार करताना दिसत नाही. या प्रकारानंतर अपेक्षेनुसार राजकीय आरोप-प्रत्यारोप होऊ लागले आहेत. सरकारने मद्यधोरणाचा पुनर्विचार करावा, अशी मागणी विरोधकांकडून होत आहे. दुसरीकडे, दारूबंदीच्या निर्णयाचा राज्यभरात नेमका काय परिणाम झाला, किती जणांनी दारू सोडली, या धोरणामुळे काय सामाजिक बदल झाले याचा धांडोळा घेण्यासाठी राज्य सरकारकडून आयआयएम रांचीमार्फत गेल्या वर्षीपासून सर्वेक्षण सुरू आहे. हे सर्वेक्षण आता अंतिम टप्प्यात आहे. परंतु यातून निघणारे निष्कर्ष हे कितपत वस्तुनिष्ठ असतील याविषयी साशंकताच आहे.

या दारूबंदीस आर्थिक विषमतेचीही किनार आहे. मद्यनिर्मितीस परवानगी नाही व मागणी मात्र आहे, अशी विचित्र स्थिती बिहारमध्ये आढळते. ज्यांना उंची, विदेशी मद्य परवडते ते मद्यप्रेमी काही करून आपली हौस भागवू शकतात. ज्यांना ते परवडत नाही असे अल्प उत्पन्न गटातील लोक मिळेल ती दारू जवळ करतात व त्यातूनच अशा दुर्घटना घडतात. बिहारचे माजी मुख्यमंत्री व विद्यमान केंद्रीय मंत्री जीतनराम मांझी हे वादग्रस्त ठरतील अशी विधाने अधूनमधून करत असतात. सप्टेंबरमध्ये त्यांनी केलेल्या एका विधानाने सत्ताधाऱ्यांना चांगलेच अडचणीत आणले. 'आम्ही उच्चभ्रू हवं तेव्हा निश्चिंतपणे दारू पितो, पोलिस आम्हाला पकडत नाहीत. मात्र, दारूबंदीचा त्रास केवळ गरिबांना होतो. हा दुटप्पीपणा थांबायला पाहिजे,' असे ते म्हणाले होते. मांझी यांचे हे विधान पोलिटिकली करेक्ट नसले तरी याद्वारे बिहारमधील मद्यधोरणाचा मुखवटाच त्यांनी फाडला हे नाकारता येणार नाही.ज्या राज्यात दारूबंदी आहे, तेथेच विषारी दारूचे सेवन केल्यामुळे बळी जात असल्याचा विरोधाभास बिहारमध्ये वारंवार दिसतो. पोलिस यंत्रणा, उत्पादन शुल्क विभाग, प्रशासकीय अधिकारी यांच्यासह खुद्द मुख्यमंत्री या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढू इच्छितात का, हा प्रश्न अनुत्तरित आहे. आपले आदर्शवादी धोरण यशस्वी करायचे असेल तर दुर्दम्य इच्छाशक्ती हवी, मात्र नितीश कुमार यांच्या सरकारमध्ये नेमका त्याचाच अभाव दिसतो. दारूबंदीची ही नशा दिवसेंदिवस अधिकाधिक घातक ठरत आहे.

# उड्डाणानंतर हवी नियोजनाची भरारी

गेल्याच आठवड्यात उलवे आणि पनवेल, नवी मुंबई, येथील नव्या विमानतळाच्या धावपट्टीचे प्रायोगिक तत्वावर, हवाई दलाच्या एका विमानाच्या आगमनाने उद्घाटन केले गेले. गेली कित्येक दशके मुंबईतील जुन्या सहार येथील गर्दीने वैतागलेल्या हवाई वाहतूक कंपन्यांना आणि प्रवाशांना यामुळे आशेचा किरण दिसू लागला. या भागाचे विधानसभेत प्रतिनिधित्व करणारे लोकप्रिय माजी आमदार दिवंगत दिनकर बाळू (दि. बा.) पाटील यांचे नाव प्रस्तावित असलेल्या या विमानतळ प्रकल्पाचे यानिमित्ताने अवलोकन करणे उचित ठरावे.



मुंबई व महामुंबईसाठी वापरात असलेल्या एकमेव व जुन्या सहार विमानतळाची क्षमता वेगाने वाढणाऱ्या विमानसेवेला पुरे पडणार नाही, हे ३० वर्षांपूर्वीच जाणवले होते. १९९७मध्येच मुंबईला पूरक ठरणाऱ्या विमानतळाच्या उभारणीसाठी १९९७मध्येच तत्त्वतः मान्यता दिली गेली होती. त्यानंतर 'आंतरराष्ट्रीय नागरी हवाई वाहतूक संस्थे'ची संमती असलेल्या तज्ज्ञांची एक समिति नेमण्यात आली. मुंबईच्या तसेच सभोवतीच्या रहिवाशांच्या व उद्योगधंद्यांच्या गरजा भागविण्यासाठी, तेही सहारच्या वाहतुकीवर दुष्परिणाम होणार नाही, अशा जागी नव्या विमानतळाचे स्थान निश्चित करणे, हे ह्या समितीचे काम होते. समितीने आधी सहा निकषांची एक यादी तयार केली. त्यात आवश्यक तेवढ्या जमिनीची उपलब्धता, सहार आणि मुंबई शहरापासून योग्य ते अंतर, विमानांना लँडिंग आणि टेक ऑफसाठी लागणारे मार्ग आणि त्यातील अडथळे, पर्यावरण आणि अवास्तव खर्चापासून बचाव हे मुख्य निकष होते.

त्याशिवाय संरक्षण आणि गृह मंत्रालयाच्या गरजा यांचाही विचार करण्याची तरतूद त्यात होती. समितीने हे सर्व लक्षात घेऊन, उत्तरेस कल्याण आणि दक्षिणेस सिंधुदुर्ग यामधील सहा जागांचे परीक्षण केले. मग रेवस-मांडवा आणि पनवेल या जागा त्यातून निवडण्यात आल्या. रेवस-मांडवा येथील जागेस स्थानिकांकडून तसेच हवाई वाहतूक क्षेत्रातील तज्ज्ञांकडूनही विरोध झाला. प्रदीर्घ परीक्षणानंतर पनवेल-उलवे ह्या जागेची शिफारस करण्यात आली. जुलै २००७च्या मुंबईच्या महाप्रलयाची आठवण ताजी होती, म्हणून पनवेल खाडी आणि निवडलेल्या जागेच्या जवळ असलेल्या लहान मोठ्या नद्यांच्या पुराचे काय परिणाम संभवतात, याविषयी पुण्याच्या सेंट्रल वॉटर आणि पॉवर संशोधन केंद्राकडून अहवाल मागविण्यात आला. पनवेलवर भरतीच्या आणि विमानतळावरून ओसरण्याऱ्या पाण्याचा काय परिणाम होईल, याकडे विशेष लक्ष पुरविण्यात आले. विमानतळासाठी टाकण्यात येणाऱ्या भरावाची उंची पनवेलकडे जास्त आणि पनवेल खाडीकडे बरीच कमी ठेवण्याचे त्यातून ठरले. त्यानंतरच निवडलेल्या जागेची शिफारस राज्य सरकार, भारत सरकार व आयसीएओ (आयकाव किंवा आंतरराष्ट्रीय नागरी विमानवाहतूक संस्था) यांच्याकडे करण्यात आली.

तरीही प्रकल्पाच्या विरोधात राजकीय दबाव मोठा होता. स्थानिक जनतेचा व पर्यावरणप्रेमींचा प्रकल्पास विरोध होता. न्यायालयात याचिका, नोटिसा यांचाही सामना त्यामुळे प्रकल्पाला करावा लागला. त्यात प्रकल्प प्रत्यक्ष सुरू होण्यात मात्र बराच वेळ गेला. या सर्व पार्श्वभूमीवर प्रकल्पाचा खर्च मूळ ९ हजार कोटींवरून २१ हजार कोटी रुपयांवर गेला आणि तो पूर्ण करण्याची तारीख अगणित वेळा पुढे ढकलण्यात आली. प्रकल्पाची निविदा त्या वेळच्या सहार विमानतळाची खासगी क्षेत्रातील कंपनीने जिंकली. परंतु प्रकल्प अर्ध्यावर असताना त्यांनी शरणागती पत्करली आणि प्रकल्पाची मालकी आणि व्यवस्थापन अदानी आणि त्यांचे परकीय भागीदार ह्यांच्याकडे आले. ह्या हस्तांतरात आणखी वेळ गेला.

कुठल्याही विमानतळावर धावपट्टी ही एक मूलभूत गरज आहे. नवी मुंबईच्या नव्या विमानतळावर दोन समांतर धावपट्ट्यांची सोय आहे. प्रकल्प एकूण चार टप्प्यांमध्ये विकसित केला जाणार आहे. त्यातल्या पहिल्या टप्प्याचा श्रीगणेशा गेल्या आठवड्यातील उड्डाणाने झाला. परंतु हवाई वाहतूकसेवा देणाऱ्या कंपन्यांना विमानतळाच्या २०२५च्या मार्चपर्यंत वाट बघावी लागेल, असा सध्याचा अंदाज आहे. आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करू पाहणाऱ्या विमानतळावर ज्या सर्व सोयी उपलब्ध असणे अत्यावश्यक आहे, त्यातल्या उरलेल्या काही सोयी येत्या काही महिन्यात उभारल्या जातील.

नव्या विमानतळावर ३७०० मीटर लांब आणि ६० मीटर रुंद अशा दोन समांतर धावपट्ट्या असतील. त्या एकमेकांपासून योग्य अंतरावर असल्यामुळे, दोन्ही धावपट्या एकाच वेळी वापरता येतील. सध्याच्या मुंबई विमानतळावर दोन धावपट्ट्या असल्या तरी त्या समांतर नव्हे, तर फुलीच्या आकाराच्या आणि कमी लांबी-रुंदीच्या आहेत. त्यामुळे नव्या विमानतळाची विमाने हाताळण्याची क्षमता सहारपेक्षा जास्त असेल. प्रवासी हाताळण्याची क्षमता, पहिल्या टप्प्यानंतर वर्षाला २ कोटी (सहारच्या एकूण क्षमतेच्या ४० टक्के) तर तिन्ही टप्पे झाल्यावर वर्षाला साडेपाच कोटी (सहारच्या दीडपट) असेल. तसेच मालवाहू क्षमताही सहारच्या दुप्पट असेल. साधारणतः खासगी वापरासाठी असलेली लहान विमाने तसेच हेलिकॉप्टर हाताळण्याची क्षमताही सहारच्या कितीतरी पटीने अधिक असेल. एकंदर तीन टर्मिनल्स प्रवाशांसाठी, आणखी एक टर्मिनल मालवाहू विमानासाठी आणि एक टर्मिनल खासगी विमानांसाठी असेल. मुंबई आणि नवी मुंबई येथील विमान वाहतुकीने एकमेकांना अडथळा न बनता, येण्या-जाण्यासाठी कुठले मार्ग स्वीकारावे हेही ठरवून झाले आहे. तसेच नव्या मुंबईच्या विमानांना विमानतळाच्या दक्षिणेला असलेल्या कर्नाळा पक्षी अभयारण्यावरून ठरावीक उंचीखालून उड्डाण करण्यास मज्जाव आहे. पर्यावरणास अनुकूल असा आणखी एक निर्णय म्हणजे खारफुटी संवर्धनासाठी उत्तरेकडचा बराच भाग सुरक्षित ठेवला गेला आहे.

या सर्व सकारात्मक गोष्टी असतानाच या नव्या विमानतळाच्या नियोजनात काही त्रुटी आहेत का? ह्या प्रश्नाचे उत्तर 'आहेत', असेच द्यावे लागेल. मुख्य त्रुटी दहशतवादी हल्ल्यांच्या प्रतिबंधात्मक सुरक्षेविषयी आहे. प्रवाशांना हाताळणारे टर्मिनल कुंपणापासून बरेच आत आहे. टर्मिनलपर्यंत नेणाऱ्या रस्त्याच्या (आणि बहुतेक नंतर बांधल्या जाणाऱ्या रेल्वेच्या दोन्ही बाजूला), विमानांचे पार्किंग आणि तोन टर्मिनल्सची सोय आहे. कुंपणाच्या रेषेत अडथळे आणि तपासणी पोस्ट ठेवले तरी ते धुडकावून, रॉकेट प्रोपेलड ग्रेनेडसारख्या अस्त्रांनी विमाने व टर्मिनलवर हल्ले करणे, कुटिल कारस्थाने करणाऱ्या दहशतवाद्यांना कठीण नाही. सध्या देशांतर्गत दहशतवादाचा निपटारा झाला आहे, असे मानून आपली पकड ढिली करणे धोक्याचे ठरेल. तिन्ही प्रवासी टर्मिनल पश्चिमी कुंपणाला लागून असती आणि विमाने कुंपणापासून दूर असती, तर सुरक्षा अधिक वाढली असती. विमानांना 'हाय व्हॅल्यू टार्गेट'च्या यादीत ठेवले जाते हे लक्षात ठेवावे. उद्दिष्टपूर्तीचा दबाव नसता, तर अशा आराखड्याला आम्ही एरव्ही मान्यता दिली नसती, असे एका वरिष्ठ सुरक्षा अधिकाऱ्याने खासगी संभाषणात सांगितले.

ह्यानंतरच्या त्रुटींचे परीक्षण करताना कुंपणाला लागून असलेल्या वाहतूक सोयीचे अवलोकन करावे लागेल. ह्यासाठी विमानतळाच्या पूर्वेला असणारा आणि एक्सप्रेसवेला जोडणारा महामार्ग, दक्षिणेला असलेला पनवेल-उरण/ जे.एन,पी.टी. महामार्ग आणि रेल्वे, ह्यांचा अभ्यास करावा. जगात सर्वत्र तज्ज्ञांकडून 'इंटरमोडल कनेक्टिव्हिटी'ला खूप महत्त्व दिले जाते. म्हणजे, माल आणि प्रवासी ह्यांचे रेल्वेतून/रस्त्यावरून, विमानात आणि उलट बदल, सोपे करणे. विमानतळाच्या दक्षिणेलाच एक एसईझेडसुद्धा आहे. असे असताना मालवाहू विमानांचे पार्किंग उत्तरेला का, दक्षिणेच्या जवळ का नाही हे समजणे कठीण आहे.

कनेक्टिव्हिटीचे आणखी दोन मुद्दे म्हणजे, पनवेल खाडीचा उपयोग करून २० ते ४० प्रवाशांच्या हॉव्हरक्राफ्टने विमानतळाला गेटवे ऑफ इंडिया आणि ठाणे खाडीला लागून असलेल्या उपनगरांना जोडणे आणि पनवेल खाडी पार करून सीबीडी बेलापूरला जोडणे. याविषयीची योजना प्रस्तावित आहे की नाही, हे पुरेसे स्पष्ट नाही. सल्लागारांच्या प्रकल्प अहवालात याची शिफारस नक्कीच होती. तसेच उपनगरीय रेल्वे/मेट्रो प्रवाशांना विमानतळाच्या पश्चिमेस आम्रा हायवेवर सोडणार, की टर्मिनलच्या जवळ, हेही स्पष्ट नाही. टर्मिनलजवळ सोडण्याची शिफारसही प्रकल्प अहवालात होती. 'एरॉट्रोपोलिस' म्हणजे विमानतळाला केंद्रबिंदू ठरवून, भोवतालचा भौगोलिक भाग निर्यातप्रधान, पण पर्यावरणास प्रतिकूल नसणाऱ्या उद्योगांनी विकसित करणे, आणि त्या बाबतीचे धोरण लवकरात लवकर स्पष्ट करणे अत्यावश्यक आहे.एव्हाना हे लक्षात आले असेल, की केवळ एक धावपट्टी आणि प्रवाशांच्या चढ-उतारासाठी एक इमारत बांधून समाधानाचा सुस्कारा सोडून चालत नाही. विमानतळ एक पांढरा हत्ती होऊ नये, तो अर्थव्यवस्थेचा आणि दळणवळणाचा एक महत्वाचा भाग व्हावा, यासाठी इतर अनेक पैलूंचा विचार करावा लागतो. तो तसा व्हायला हवा.

# समुद्राच्या पोटात चाललंय काय...

गडद निळा किंवा मोरपिशी रंगाचा लाटांचा पारदर्शक पडदा, त्यातून डोकावल्यास लालबुंद-जांभळे, हिरवे अशा रंगांचे तुडुतुडू धावणारे मासे, शेंदरी रंगाचे प्रवाळ, काटेरी झुडुपे, एखाददुसरा तारामासा, शंख-शिंपले असे विलोभनीय दृश्य अंदमानच्या समुद्रात दिसते. स्कुबा डायव्हिंग किंवा समुद्राखाली पदभ्रमण केल्यास हे दृश्य डोळे दिपवून टाकते. समुद्राच्या पृष्ठभागाखाली ही अशी नवलाई असली, तरी काही गूढ हालचालीही तिथे सुरू असतात. त्या थेट आपल्या देशाच्या सुरक्षेला आव्हान देणाऱ्या असतात. या हालचाली किनारपट्टीपासून खूप दूरवर आणि खोलवर सुरू असतात. त्यांचा वेध घेण्यासाठी दृष्टी नव्हे, तर ध्वनी आणि श्रवण या दोन गोष्टी आवश्यक असतात. समुद्राच्या पोटात चाललंय काय, याचा अचूक आणि अव्याहत वेध घेत राहणे, हे आता सामरिक दृष्टीने नितांत गरजेचे ठरू लागले आहे.

या पार्श्वभूमीवर भारतीय संरक्षण दलांच्या व्यूहरचनेत गेल्या काही दिवसांत दोन महत्त्वाच्या घडामोडी घडल्या आहेत. त्यापैकी एक म्हणजे 'आयएनएस अरिघात' या अण्वस्त्रे डागण्याची क्षमता असलेल्या व अणुइंधनावर चालणाऱ्या दुसऱ्या पाणबुडीचा भारतीय नौदलाच्या ताफ्यात झालेला समावेश. ('आयएनएस अरिहंत' ही त्यातली पहिली). दुसरी घटना याच आठवड्यातली. ती म्हणजे तेलंगणमधील विकाराबाद येथे दामगुडमच्या जंगलात तब्बल २९०० एकर क्षेत्रावर भारतीय नौदलाने एका अद्ययावत अतिदूरसंपर्कयंत्रणेच्या प्रणालीची पायाभरणी केली. ३२०० कोटी रुपये खर्चून उभारण्यात येत असलेले हे व्हीएलएफ म्हणजे व्हेरी लो फ्रिक्वेन्सी स्टेशन किंवा भूमीपासून कमी अंतरावरील अतिसूक्ष्म लहरींचे संपर्क केंद्र २०२७पर्यंत इथे उभे राहील. या केंद्रात संपर्कलहरींचे प्रसारण करण्यासाठी अनेक उंच मनोरे उभारले जातील. या मनोऱ्यांद्वारे हिंदी महासागरातच नव्हे, तर पृथ्वीच्या गोलाईवर कुठेही उभ्या असलेल्या नौका-हेलिकॉप्टर यांना सांकेतिक संदेशांचे प्रसारण करता येईल.

**भारतीय पाणबुड्यांना सांकेतिक संदेशवहन**

नौदलाच्या भात्यातील एक महत्त्वाचे छुपे अस्त्र म्हणजे पाणबुडी. ही पाणबुडी समुद्राच्या पृष्ठभागाखाली गेली की तिच्याशी इतर नौकांसारखा संवाद शक्य नसतो. किंबहुना, तो अनावश्यकच ठरतो. कारण पाणबुडीचा जर कुणाला ठावठिकाणा लागला, तर तिच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जातो. साहजिकच उपग्रहआधारित संवाद इथे शक्य नसतो. परंतु पाणबुडीला आपल्या नौदलाच्या कमांड-कंट्रोल कक्षाद्वारे काही महत्त्वाचे व्यूहरचनात्मक संदेश धाडणेही वेळोवेळी गरजेचे असते. मग अशा वेळी संपर्क कसा साधायचा? त्यासाठीच ही व्हीएलएफ यंत्रणा उपयुक्त ठरते. अत्यंत कमी उंचीपर्यंत म्हणजे ३ ते ३० किलोहर्टझ् इतक्या पातळीवर हे संदेश धाडले जाऊ शकतात. ही गरज भारताने यापूर्वीच ओळखली होती. त्यामुळे १९९०पासून तमीळनाडूतील तिरूनेलवेली येथे अशा प्रकारचे व्हीएलएफ केंद्र अस्तित्वात आले. मात्र आता पाणबुड्यांच्या जगतात झालेले तंत्रबदल व हिंदी महासागरातील आव्हानांमुळे भारताच्या टेहळणीच्या कक्षा रुंदावल्या. त्यामुळे अधिक प्रगत केंद्राची आवश्यकता निर्माण झाली.

**पाणबुड्या संदेश कसा मिळवतील ?**

भारताकडे असलेल्या पारंपरिक डिझेल-इलेक्ट्रिक श्रेणीतील पाणबुड्यांना साधारण ४८ तासांनी तरी बॅटरी चार्ज करण्यासाठी समुद्रातून डोके वर काढावे लागते. मात्र आता नव्याने दाखल झालेल्या अणुभट्टीवर चालणाऱ्या पाणबुड्या महिनोन् महिने समुद्राखाली राहू शकतात. अशा पाणबुड्या संपर्कग्रहणासाठी त्यांचा एक ॲन्टेना त्यांच्या गरजेनुसार समुद्रपृष्ठावर काढतील आणि ज्यावेळी ॲन्टेना वर डोकावेल, तेव्हा त्यास व्हीएलएफ रेडिओलहरींचा संदेश ग्रहण करता येईल. हा सांकेतिक संदेश उलगडण्याचे (डिकोडिंगचे) काम तंत्रज्ञ करतील. त्यानुसार पाणबुडीचा कप्तान पुढील मार्गक्रमणा किंवा एखादी कृती ठरवू शकेल. यात पाणबुडी मात्र शक्यतोवर इतरांशी बोलणार नाही. कारण तसे झाल्यास तिचा ठावठिकाणा समजून येईल.

**अणुपाणबुड्या व संदेशवहन**

भारतीय नौदलाच्या ताफ्यात आयएनएस अरिहंत ही सुमारे साडेसातशे किलोमीटर पल्ल्यापर्यंतचा लक्ष्यवेध घेऊ शकणारी पहिली पाणबुडी प्रथम दाखल झाली. आता 'आयएनएस अरिघात'वरील के ४ या क्षेपणास्त्राचा पल्ला साडेतीन हजार किलोमीटर इतका आहे. याच एसएसबीएन श्रेणीमध्ये 'आयएनएस अरिधमन' ही आणखी एक पाणबुडी दाखल करण्याचे प्रस्तावित आहे. तर एसएसएन म्हणजे केवळ अणुइंधनावर चालणाऱ्या (अण्वस्त्रधारी नव्हे) दोन पाणबुड्याही ताफ्यात घेण्याची भारताची योजना आहे. अण्वस्त्रांचा प्रथम वापर भारत करणार नाही, हे धोरण आहे. मात्र अन्य कोणत्या राष्ट्राने तो केलाच, तर आपल्या भूमीपासून दूरवरून प्रतिहल्ला करता यावा, हे या अण्वस्त्रधारी क्षमता असलेल्या पाणबुड्यांचे उद्दिष्ट आहे. अणुइंधनामुळे पाणबुडीची पाण्याखाली राहण्याची क्षमता कमालीची वाढते. मात्र इतका प्रदीर्घ काळ मूळ व्यूहरचनाकारांपासून विलग राहणेही परवडणारे नसते. त्यासाठीच हे संदेशवहन आवश्यक ठरते. बाकी पाणबुडीत एखादी दुर्घटना झाल्यास त्यातील नौसैनिकांना वाचविण्यासाठी पाण्याखालील बचावाचे एक वाहनही आता नौदलाने ताफ्यात सज्ज ठेवले आहे.

**समुद्राच्या पोटातील आव्हाने**

समुद्री क्षेत्रात प्रतिस्पर्ध्याला अचानक चकित करून गारद करण्यात किंवा विशिष्ट क्षेत्रात शिरकाव करण्यापासून रोखण्यात पाणबुडीचे स्थान आजवर अनन्यसाधारण राहिले आहे. हिंदी महासागराच्या विस्तीर्ण क्षेत्रात चीनने त्यांच्या पाणबुड्यांचा संचार वाढवला आहे. त्या अरबी समुद्रापर्यंत येऊ लागल्या आहेत. या संचाराला अटकाव करायचा, तर आपल्याला समुद्राच्या पृष्ठाखाली काय चालले आहे, त्याचे सातत्याने आकलन करून घ्यावे लागते. २६ नोव्हेंबर २००८च्या हल्ल्यानंतर समुद्री क्षेत्र आकलन (मॅरिटिम डोमेन अवेअरनेस) या विषयावर भारताने बरेच लक्ष केंद्रित केले. त्यादृष्टीने आवश्यक त्या सामग्रीची भर घातली. मात्र त्यापुढचे एक पाऊल म्हणजे समुद्राखालील क्षेत्राचे आकलन (अंडरवॉटर डोमेन अवेअरनेस). ही संज्ञा आता जोर धरू लागली असून खासकरून हिंदी महासागराच्या बाबतीत व हिंद-प्रशांत क्षेत्रातील आव्हानांच्या बाबतीत तिचा संदर्भ अधिक घेतला जातो.

**समुद्राखालील सेन्सर्सचे स्थान महत्त्वाचे**

समुद्री क्षेत्रात अनोळखी व संशयित जहाजांचा धोका वाढत असून तो केवळ समुद्रपृष्ठालगत मर्यादित राहिलेला नाही, तर समुद्रपृष्ठाखालीही अशा 'ब्लॅक शिप्स'चा धोका आहे, त्यासाठीच समुद्राच्या पोटातील हालचाली टिपण्याच्या तंत्रात पारंगत होणे गरजेचे ठरते, असा मुद्दा संरक्षणतज्ज्ञ व भारताच्या अंटार्क्टिका मोहिमेत प्रतिनिधित्व केलेले नौदल अधिकारी निवृत्त कॅप्टन सरबजित परमार अधोरेखित करतात. ते म्हणतात, व्हीटीएमएससारख्या यंत्रणांद्वारे समुद्रात संचार करणाऱ्या जहाजांची ओळख पटविली जाते. जलवाहतुकीतील संशयास्पद संचारावर आपली पाळत असतेच. त्यासाठीच गुरगाव येथे हिंदी महासागरासाठीचे इन्फर्मेशन फ्युजन सेन्टर कार्यान्वित करण्यात आले आहे. या टेहळणीतही सर्वात छोट्या नौकांची ओळख पटविणे आव्हानच असते. मात्र त्याहीपेक्षा मोठे आव्हान म्हणजे समुद्रपृष्ठाखालील हालचालींचा वेध घेणे. त्यासाठीच समुद्राखाली हालचाली टिपणारे सेन्सर्स बसविणे आवश्यक ठरते. हे अत्यंत खर्चिक काम असते. समुद्रातील क्षारांचे प्रमाण व अन्य नैसर्गिक प्रतिकूलता यावरही या टेहळणीयंत्रांची परिणामकारकता ठरते. खोल समुद्र हा चहूबाजूंनी अफाट पसरलेला असतो. तिथे नेमके कुठे हे सेन्सर्स बसवायचे, हे अचूक ठरवावे लागते. जिथे शत्रूच्या पाणबुड्या किंवा संशयास्पद हालचालींची शक्यता अधिक आहे, जिथे आपल्या देशाच्या हिताला बाधा पोहोचू शकते, अशा नेमक्या ठिकाणी हे सेन्सर्स बसवावे लागतात. अर्थात केवळ सेन्सर्सवर आपली भिस्त ठेवून चालत नाही. त्यासाठीच परस्पर मित्रराष्ट्रांमधील गोपनीय माहितीचे आदानप्रदान यावर भर द्यावा लागतो. दोन राष्ट्रांमध्ये करारमदार झाल्याखेरीज इतर राष्ट्राच्या हद्दीत किंवा हितसंबंधी क्षेत्रात आपल्याला पाळत ठेवणेही शक्य नसते. या सर्वांचा समुद्राखालील क्षेत्राचे आकलन वाढविताना विचार करावा लागतो.

# माझा विजय स्वाभिमानी मतदारांना समर्पित-आ.विजयसिंह पंडित








**गेवराई । प्रतिनिधी**

कार्यकर्त्यांचे परिश्रम, आदरणीय भैय्यासाहेब यांचे परफेक्ट नियोजन आणि मतदारांचा विश्वास यामुळे विजय मिळाला. आजचा विजय गेवराई विधानसभा मतदारसंघातील तमाम स्वाभिमानी मतदारांना समर्पित करत आहे अशी प्रतिक्रिया नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केली. या विजया मुळे आजवरचे सर्व राजकीय हिशोब चुकते केले आहेत. आदरणीय शिवाजीराव दादांचे स्वप्न साकारले आहे. मोठी जबाबदारी मतदारांनी दिली आहे ती सार्थ करण्याचा नक्की प्रयत्न करणार असल्याचे भावना जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केली. गेवराई विधानसभा मतदारसंघातून विजयसिंह पंडित यांचा मोठा विजय झाल्यानंतर ते बोलत होते. गढी पासुन ते गेवराई शहरात भव्य मिरवणूक काढून कार्यकर्त्यांनी हा आनंद साजरा केला. विजयसिंह पंडित यांनी मतदारांसह नेत्यांचे आभार व्यक्त केले.

गेवराई विधानसभा मतदारसंघा साठी झालेल्या मतमोजणी साठी प्रारंभी पासूनच विजयसिंह पंडित यांनी मोठी आघाडी घेतली होती, ती शेवटपर्यंत कायम ठेवली आणि प्रत्येक फेरी अखेर ती वाढतच गेली. विजयसिंह पंडित यांना एकूण १,१६,१५१ मते मिळाली असून त्यांनी ४२,३९० मतांनी विजय मिळवला. मतमोजणी दरम्यान कार्यकर्ते आणि मतदार यांनी मोठा जल्लोष केला. गढी येथील मतमोजणी केंद्रापासून पासुन नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. गेवराई शहरात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष करून आनंद साजरा केला.

नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित यांनी हा विजय स्वाभिमानी मतदारांना समर्पित केला आहे. कायम जनतेच्या सेवेत राहणार असल्याचे त्यांनी सांगून या निवडणूकीत सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.यावेळी निवडणूक निरीक्षक लालटनपुई वॉंगचॉंग, निवडणूक निर्णय अधिकारी सतिश धुमाळ, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तहसिलदार संदिप खोमणे यांच्या हस्ते विजयसिंह पंडित यांना निवडणूकीत विजयी झाल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी निवडणूक निरिक्षक तथा संपर्क अधिकारी ज्ञानोबा मोकाटे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विक्रम मांडूरके यांच्या सह निवडणूक विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्व निवडणुक कर्मचारी आणि अधिकारी यांचे आ. विजयसिंह पंडित यांनी आभार मानले.

यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, माझ्या विजयामध्ये उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष खा. सुनिल तटकरे, ना. धनंजय मुंडे, भाजपाच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजा मुंडे यांच्यासह मतदारसंघातील राष्ट्रवादी कॉंग्रेस, भाजपा आणि मित्र पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते आणि मतदार बंधू भगिनींचा मोठा वाटा आहे. मला तुम्ही भरभरून आशीर्वाद दिला मतदारसंघांमध्ये माझ्या विरोधात खूप मोठ्या प्रमाणावर अपप्रचार झाला, जात पात धर्म यामध्ये मला अडकवण्याचा प्रयत्न केला गेला, परंतु मायबाप मतदारांनी जात पात धर्म या पलीकडे जाऊन मला आशीर्वाद दिले. कार्यकर्त्यांनी आपणच उमेदवार आहोत या भावनेतून काम केल्यामुळे मी हा विजय मिळवू शकलो. शिवछत्र परिवार जात पात धर्म यापलीकडे जाऊन काम करतो हे तुम्ही या निमित्ताने दाखवून दिले आहे. यापुढील काळात आपण सकारात्मक काम करुन मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलणार असल्याचे सांगून गेवराई विधानसभा मतदारसंघातीलया सर्व समाजातील मतदार बांधवांनी माझ्यावर जो विश्वास टाकला त्याला मी तडा जाऊ देणार नाही. येणाऱ्या पाच वर्षांमध्ये मला मिळालेल्या संधीचे मी सोने करेल असेही आ. विजयसिंह पंडित यांनी यावेळी सांगितले.यावेळी बोलताना माजी आमदार अमरसिंह पंडित म्हणाले की गेवराई विधानसभा मतदारसंघातील तमाम मतदार बंधू-भगिनींनी विजयवर विश्वास टाकला त्याबद्दल त्यांचे मी जाहीर आभार मानतो. आ. विजयसिंह पंडित यांचा हा विजय ऐतिहासिक आहे या विजयामुळे मला मनस्वी आनंद होतो आहे. आज १९९५ च्या निवडणुकीची मला आठवण झाली. आज या निमित्ताने सगळे हिशोब चुकते झाले. निवडणुकीच्या निमित्ताने दिलेला शब्द पूर्ण करण्याचा विश्वास देतो. या ऐतिहासिक निकालामुळे शिवछत्र परिवाराच्या सातबारावर तुम्ही तुमचे नाव कोरले आहे, तेव्हा यापुढे विकासाची कामे तर होतीलच परंतु सामान्य माणसांना कोणताही त्रास होणार नाही याची खबरदारी घेतली जाईल असेही ते यावेळी म्हणाले.याप्रसंगी माजी आमदार अमरसिंह पंडित आणि नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित यांच्यासह कार्यकर्त्यांनी विजयी रॅली काढली. गढी ते गेवराई निघालेल्या या रॅलीमध्ये कार्यकर्त्यांनी विजयी जल्लोष केला. विजयसिंह पंडित यांच्या विजयानंतर गेवराई आणि बीड येथील निवासस्थानी कार्यकर्त्यांनी विजयी जल्लोष केला. यावेळी माजी आमदार अमरसिंह पंडित नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित जयभवानी कारखान्याचे संचालक जयसिंग पंडित यांनी मतदारांचे जाहीर आभार मानले.

## राष्ट्रीय सचिव असलेल्या पंकजाताई,अपक्ष उमेदवाराचे समर्थन करून

# तुम्ही मला धोका द्यायला नको होता;आ.सुरेश धस यांचा घणाघात;आष्टीत कोणी कितीबी येऊ द्या,एकच बास चा नारा





**आष्टी । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या राष्ट्रीय सचिव असलेल्या पंकजाताई मुंडे यांनी चुकीच्या माणसाचे ऐकून भीमराव धोंडे या अपक्ष उमेदवाराला विजयी करा असे फोन करून भाजपा उमेदवार असलेल्या सुरेश धस यांना पराभूत करा असा प्रचार करून मला धोका द्यायला नको होता असा घणाघात आष्टी विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीचे विजयी उमेदवार आ.सुरेश धस यांनी केला आष्टी येथील विजयी सभेमध्ये ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर माजी आमदार साहेबराव दरेकर उद्धव दरेकर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी आष्टीचे माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे,विद्यमान नगराध्यक्ष जिया बेग, पाटोदा नगराध्यक्ष राजू जाधव,शिरूर नगराध्यक्ष रोहिदास गाडेकर,पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती किरण शिंदे पाटील, भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा चे प्रदेश सचिव अभिजीत शेंडगे,ज्ञानेश्वर माऊली जरांगे,दिव्यांग संघटनेचे जेष्ठ नेते शरिषभाऊ थोरवे,यशवंत खंडागळे,अरुण भैय्या निकाळजे उपस्थित होते पुढे बोलताना आ.सुरेश धस पुढे म्हणाले की,मी माझ्या राजकीय आयुष्यात कधीही जात-पात धर्म पाहून राजकारण केले नाही आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील उर्वरित विकास कामांसाठी मी कटिबद्ध असून खुंटेफळ साठवण तलावामध्ये १.६८ टीएमसी पाणी आले आहे, त्यामध्ये आणखी ४.०० टीएमसी पाणी आणून शेती सिंचनासाठी पाणी उपलब्ध करावयाचे आहे,पैठण पंढरपूर या राष्ट्रीय महामार्गावरील भूसंपादनाचा प्रश्न मार्गी लावायचा आहे,शिरूर आणि पाटोदा तालुक्यातील दुष्काळी भागासाठी गोदावरी खोऱ्यातील पश्चिम वाहिनीचे पाणी जायकवाडी तलावामध्ये आणून तिथून या दोन्ही तालुक्यासाठी पाणी आणावयाचे आहे,राज्यमार्ग क्रमांक २ वरील वेडी वाकडी वळणे काढून दर्जेदार करावयाचा आहे,पाटोदा तालुक्यातील तीन मध्यम प्रकल्पांच्या उंची वाढवायची आहे,सुरत चेन्नई या राष्ट्रीय महामार्ग वरील आष्टी तालुक्यातील चुकीचे भूसंपादन झालेले असून त्याची चौकशी लावून शेतकऱ्यांच्या जमिनीवर लबाडांना पैसे मिळू देणार नाही, तसेच सुरत चेन्नई या मार्गाला संभाजीनगर पुणे या महामार्गाला जोडण्याचा प्रयत्न करण्यात येईल तसेच बीड ते नगर हा रस्ता १२ मीटर सिमेंट कॉंक्रेट चा करावयाचा आहे आष्टी आणि पाटोदा तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची हेळसांड होऊ नये म्हणून लवकरच साखर कारखाना उभारणी करणार आहे, वन्यजीव अभयारण्या मध्ये ४२०० हेक्टर क्षेत्रा वर भारतीय प्रजातीची वृक्षांची लागवड करण्यात येऊन त्या ठिकाणी पर्यटन स्थळ निर्माण करण्यात येतील कडा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा सुशोभीकरण करण्यात येऊन चौकाच्या मध्ये बसवण्यात येईल, डोंगर भागातील शेतकऱ्यांना रानडुकरापासून संरक्षण होईल यावर उपाययोजना करण्यात येतील, असे सांगून निवडणुकीतील अनुभव विषयी सांगताना ते म्हणाले की, माझा पराभव व्हावा यासाठी कटकारस्थान करण्यात आले, लोकसभा निवडणुकीत मी पंकजाताई मुंडे यांचे मनापासून आणि प्रामाणिकपणे काम करून स्वतःच्या मराठा समाजाला अंगावर घेण्याचे काम केले बीड जिल्ह्यात अनेक ठिकाणी त्यांना काळे झेंडे दाखवण्याचे काम केले परंतु माझ्यामुळे आष्टी, पाटोदा, शिरूर तालुक्यामध्ये काळे झेंडे दाखवले गेले नाहीत,मराठा समाजाची प्रचंड नाराजी असताना देखील मतदारसंघांमध्ये ३२ हजारांचे मताधिक्य दिले असूनही चुकीच्या माणसांचे ऐकून पंकजाताई मुंडे यांनी मला धोका दिला, हे माझ्या हृदयाला लागले असून माझ्या वडिलांच्या निधना इतके दुःख मला झाले आहे धनंजय मुंडे यांच्या विषयी बोलताना ते म्हणाले त्यांचा पक्ष वेगळा आहे त्यांच्याकडून मला अपेक्षा नव्हती परंतु तरीही त्यांनी काही कार्यकर्त्यांनी मदत करण्यास सांगितले त्यांची मदत मला झाली आहे राजकारणात दिलेला शब्द पाळावा लागतो,पंकजाताई यांच्यासाठी मी २० १७ मध्ये जिल्हा परिषद ताब्यात देताना माझ्या राष्ट्रवादी पक्षाचे ५ जि.प.सदस्यांचे बलिदान केले असून पक्षाने त्यांना अपात्र केले हा अपात्रतेचा शिक्का घेऊन माझे हे खंबीर कार्यकर्ते आपले काम करत होते त्यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष हे पद सर्वसाधारण असूनही सविता विजय गोल्हार यांना जिल्हा परिषद अध्यक्षपदी बसवून मी मराठा समाजाचा रोष ओढवून घेतला याची जाणीव विजय गोल्हार यांनी ठेवली नाही,पंकजाताई, आपणा सोबत फिरणाऱ्या माणसांविषयी थोडा विचार करावा,आपण आपला मार्गदर्शक बदलावा असे सांगून आ.सुरेश धस पुढे म्हणाले की, भीमराव धोंडे यांचे कार्यकर्ते २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत प्रीतम ताई चे विरोधात काम करत होते तेव्हा हे ओबीसी नेते कुठे होते ?यांचे अर्धे आयुष्य झोपेत गेले आणखी कशाकशात गेले हे मी आता सांगत नाही परंतु मी मनात आणले तर त्यांचे उर्वरित आयुष्य जेलमध्ये जाईल परंतु माझी नियत तशी नाही, मागील विधानसभा निवडणुकीमध्ये भीमराव धोंडे हे पराभूत झाले त्यावेळी मी पैसे घेतले आणि ते परत केले नाही असा बालीश आरोप त्यांनी केला याबाबत त्यांनी भगवान गडावर, नारायण गडावर,तारकेश्वर गडावर, किंवा गहिनीनाथ गडावर वामन भाऊ यांच्या समाधीवर हात ठेवून शपथ घ्यावी असे आव्हान देऊन ते पुढे म्हणाले की, भीमराव धोंडे यांच्या शिक्षण संस्थेतील संस्थेचे अधिकारी काय काय गैरप्रकार करत आहेत ? याची चौकशी करा आणि यापुढे त्यांनी त्यांचे वर्तन बदलावे असा सज्जड दम दिला बाळासाहेब आजबे यांचे विषयी बोलताना ते म्हणाले की, तुम्ही निवडून कसे आलात ? हे तुम्हालाच माहिती नाही त्यावेळी जयदत्त धस यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज असल्यास मला उमेदवारी नको असे माझ्या घरी येऊन म्हणाला होतात तुम्हाला १ लाख २६ हजार मते मिळाली होती ती सर्व तुमची आहेत असे सांगत होतात मग त्यातील १ लाख ५ हजार आता मते कुठे गेली ? असा सवाल करून ते म्हणाले की, आगामी पन्नास वर्षात आजबे आडनावाचा माणूस विधानसभा निवडणुकीत दिसणार नाही असे काम आपण पाच वर्षात केले आहे, केवळ पैसे मिळवून चालत नसते, लूट करून चालत नसते, राजकारणामध्ये माणसेही कमवावे लागत असतात असे सांगून बाळासाहेब आजबे आमच्या घराण्याच्या खोडावर घाव घालायला निघाले होते जनतेने त्यांना २१ हजार मते देऊन त्यांची लायकी दाखवली आहे त्यांना मी फरशी कुऱ्हाड आणून देतो त्यांनी कधीही रानात जाऊन घाव घालीत बसावे अशी मिश्किल टिपणी केली अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे यांनी मी भाजप उमेदवारी देवेंद्र फडणवीस यांचे कडून आणली आहे त्यामुळे माझ्यावर मराठा समाज नाराज होईल असा जाणीवपूर्वक प्रचार केला म्हणजे मला वंजारी समाजाकडून आणि मराठा समाजाकडून असा दोन्ही कडून विरोध होईल असे कोंडीत पकडण्याचा प्रयत्न झाला परंतु मी गोपीनाथ मुंडे साहेबांचा चेला आहे शिकार करताना किड्या मकोड्याची करावयाची नसते तर वाघाची करायची असते, मी एवढा साधा सोपा नाही मी झुकणार नाही मोडेन पण वाकणार नाही या बाण्याचा असून मी आता पाच टर्म आमदार असल्यामुळे मी आता वरिष्ठ आहे, पंकजाताई मुंडे यांच्या पेक्षा मी दहा वर्षे राजकारणात सीनियर आहे तुम्ही माझ्याशी असे वर्तन करावयाला नको होते असे पुन्हा एकदा त्यांनी भावना विवश होऊन सांगितले आष्टी मतदार संघातील मराठा आणि वंजारी समाजाला बरोबर घेऊन मी काम केले आहे आणि करणार आहे यापूर्वी मी सर्वसाधारण जागेवर वंजारी समाजाच्या रेखा गोवर्धन सानप यांना पाटोदा पंचायत समितीच्या सभापती पद दिले त्याचबरोबर अनेक पदाधिकारी मी वंजारी धनगर माळी या इतर मागासवर्गीय समाजातील लोकांना दिले आहे या निवडणुकीमध्ये मला मराठा समाजा बरोबरच वंजारी समाजाने देखील भरभरून मते दिले असून धनगर समाजाने देखील ८५ टक्के मते दिले आहेत तसेच अनेक गावांमध्ये माळी समाजाने देखील मते दिले आहेत त्यामुळेच माझा विक्रमी मतांनी विजयी झाला असून मला १ लाख ४० हजार विक्रमी मते मिळाली आहेत असे सांगितलेओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी भीमराव धोंडे यांना विजयी करा असे आवाहन केले होते त्याबाबत टिपणी करताना सुरेश धस म्हणाले की लक्ष्मण हाके यांना माढा येथे ५००० मध्ये पडले आहेत त्यांनी आष्टी विधानसभा मतदारसंघातील तीन लाख ८५००० मतांच्या एवढ्या मोठ्या मतदारसंघात कारभार करण्याचा विचार करू नये असे सांगितले.

# महायुतीच्या अभूतपूर्व विजयाचा अनिल दादा जगताप यांच्याकडून जल्लोष साजरा

## एकनाथजी शिंदे साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदावर वर्णी लागावी यासाठी शिवसैनिकांकडून साकडे

**बीड । प्रतिनिधी**

नुकत्याचा पार पडलेल्या महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीत मा.ना.एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली महायुतीला मिळालेल्या अभूतपूर्व विजयी यशाबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या मार्गर्शनाखाली बीडमध्ये शिवसैनिकांनी महायुतीचे अभिनंदन करत मोठ्या हर्षल्हासात आनंद सोहळा साजरा केला तसेच हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर मा. आनंद दिघे साहेब यांच्या विचारांचा वारसा घेऊन महाराष्ट्रभरात सर्व सामन्यांसाठी कल्याणकारी योजना राबवत यशाची पताका फडकावणारे शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदावर वर्णी लागावी यासाठी बीड शहरातील सोमेश्वर महादेव मंदिरात भावीक भक्तांच्या उपस्थितीत सामूहिक आरती करून जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या समर्थकांनी साकडे देखील घातले.

काल सोमवारी दि. २५ नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना महिला आघाडी, युवासेना पदाधिकारी लोकप्रतिनिधी





शिवसैनिकांनी एकत्रित येऊन महापुरुषांना अभिवादन केले. त्यानंतर हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून फाटक्यांची आतषबाजी करत शिवसेनेचा जयघोष केला तसेच सर्वांनी मिठाई वाटून आनंदत्सव साजरा केला. मा.मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणी, लाडके भाऊ, लाडके शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, कार्यकर्ते व लाडके शिवसैनिक यांच्या कष्टातून विधानसभा निवडणुकीत आपणांस भरघोस यश मिळाले असल्याच्या भावना याप्रसंगी व्यक्त करण्यात आल्या. या निमित्ताने सायंकाळच्या दरम्यान शिवसैनिक तथा महिला भगिनींनी पणती व दिवे प्रज्वलीत केले तसेच विविध मंदिरात देखील शिवसैनिकांनी देवी देवतांच्या चरणी नतमस्तक होऊन आरत्या केल्या व शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदावर वर्णी लागावी यासाठी प्रार्थना केली.


तळागाळातील माणसांची जान असणारे सर्व सामान्यांचे नेतृत्व म्हणून अवघ्या महाराष्ट्रभरातील जेष्ठ, तरुणाई, शेतकरी, कष्टकरी, महिला भगिनी यांच्यात आमचा सक्षम आधार अशी विश्वास निर्माण करणारे शिवसेना मुख्य नेते मा. ना. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली महायुतीने विधानसभा निवडणुकीत अभूतपूर्व यश प्राप्त केले असून आता शिंदे साहेबच महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्री पदासाठी सर्वोपरी योग्य चेहरा आहे व शिंदे साहेबच पुन्हा मुख्यमंत्री बनावेत अशी भावना शिवसैनिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे व राज्याच्या विकासाठी शिंदे साहेबांच्याच हातात मुख्यमंत्री पदाची धुरा द्यावी अशी एक शिवसैनिक म्हणून महायुतीच्या जेष्ठ श्रेष्ठींना विनंती आहे असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी आपली भावना व्यक्त केली.

## विजयात लाडक्या बहिणींचा वाटा खूप मोठा

# माझ्या मतदारसंघात जरांगेंचा परिणाम निश्चितपणे झाला,परंतु इतर मायनॉरिटीजने तारले-भुजबळ

**नाशिक (वृत्तसंस्था)**–राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी महायुतीच्या विजयावर प्रतिक्रिया दिली आहे. तसेच लाडक्या बहीणींचा या विजयात मोठा वाटा असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. मनोज जरांगेंचा परिणाम केवल माझ्या मतदारसंघात मला पाहायला मिळाला आणि त्याचा परिणाम देखील झाला असल्याचे भुजबळ म्हणाले आहेत.

छगन भुजबळ म्हणाले, लोकसभेच्या निवडणुकीनंतर जे नैराश्य आले होते ते नैराश्य दूर करण्यामध्ये देवेंद्र फडणवीस, अजित पवार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आपल्या सर्व सहकाऱ्यांना घेऊन प्रचंड मेहनत घेतली आहे. विशेषतः अजित पवार सकाळी ६ वाजता बाहेर पडायचे आणि रात्री उशिरा यायचे. सगळ्यांनीच खूप मेहनत घेतली. लोकांमधील संभ्रम दूर केला आणि या सगळ्यात लाडक्या बहिणीचा वाटा खूप मोठा आहे. वेळेवर सगळ्या बहिणींना पैसे मिळतील याचे नियोजन अजित पवारांच्या खात्याने केले. त्यामुळे सर्वांना खात्री पटली की हे सरकार जे बोलत आहे ते करत आहे. त्यामुळे जनतेने आपल्यावर विश्वास दाखवला, असे छगन भुजबळ म्हणाले.शरद पवारांबद्दल बोलताना छगन भुजबळ म्हणाले, शरद पवारांनी माझ्या मतदारसंघात सभा घेतली तसेच माझ्या विरोधात कोणता उमेदवार द्यायचा याचा सगळ्याचा त्यांनी व्यवस्थित अभ्यास केला होता. त्याप्रमाणे त्यांनी निर्णय घेतले. पण आमचे मित्र जरांगे त्यांचे काय काम होते? त्यांनी तर सांगितले होते की मी या निवडणुकीत पडणार नाही, पाडणार नाही, बोलणार नाही, माझा कोणाला पाठिंबा नाही, माझा



कोणाला विरोध नाही. पण प्रचार संपण्याच्या आदल्या दिवशी सकाळी १० वाजल्यापासून रात्री २ वाजेपर्यंत हाताला सलाईन आणि मी पाहा, मी आजारी आहे, माझे काहीही आता होईल, मी समाजासाठी मरतोय, यांनी विरोध केला आणि यांना पाडा. परंतु माझ्या मतदारसंघात त्याचा परिणाम निश्चितपणे झाला, माझ्या मताधिक्यावर त्याचा परिणाम झाला. परंतु, ते जेवढे झाले तेवढेच इतर जे मायनॉरिटीज आहेत, अगदी हिंदू असतील, मुस्लिम असतील, आदिवासी, ओबीसी सगळे एकवटले आणि त्यांनी आमचे तारू जे आहे ते किनाऱ्याला लावले.आम्ही फक्त आमचा नेता विधिमंडळाचा अजितदादा पवार यांची सर्वानुमते नेमणूक केली आहे. आता शिंदे यांचे नेतेपदी कोण आहे, भाजपचे नेतेपदी कोण आहे ते अजून कळायचे आहे. परंतु आमचा देवेंद्र फडणवीस यांना विरोध असण्याचा काही कारण असेल असे मला तरी वाटत नाही.

# शपथविधीपूर्वी शिवतीर्थावर घडामोडींना वेग:मनसेच्या दारुण पराभवानंतर राज ठाकरेंनी बोलावली तातडीची बैठक

**मुंबई (वृत्तसंस्था)**–महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून महायुतीला बहुमत मिळाले आहे. तसेच २५ नोव्हेंबर रोजी वानखेडे स्टेडियम अथवा राजभवनात शपथविधी देखील होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे यांनी तातडीची बैठक बोलावली आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी बैठक बोलावली आहे. उद्या सकाळी राज ठाकरे यांच्या दादर येथील शिवतीर्थ या निवासस्थानी बैठक बोलावली आहे. मनसेचे प्रमुख नेते या बैठकीसाठी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे या बैठकीत राज ठाकरे काय बोलणार तसेच बैठकीत काय महत्त्वाचा निर्णय घेतला जाणार याकडे लक्ष असणार आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने यंदाच्या विधानसभा निवडणुकीत १२८ मतदारसंघात उमेदवार उभे केले होते. मात्र, मनसेचा एकही उमेदवार निवडून आला नाही. तसेच मनसेचा एकमेव आमदार राजू पाटील हे देखील पराभूत झाले आहेत. माहीम विधानसभा मतदारसंघात अमित ठाकरे यांचा देखील पराभव



झाला आहे. विधानसभा निवडणुकीत झालेल्या या दारुण पराभवानंतर राज ठाकरे यांनी बैठक बोलावली आहे. सोमवारी होणारी ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीत भाजपने उत्तम कामगिरी केली आहे. १९९० नंतर विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक जागा जिंकणारा भाजप हा पहिला पक्ष ठरला आहे. त्यामुळे आता महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावर महायुतीमधील कोणता चेहरा पुढे येतो याकडे देखील सर्वांचे लक्ष असणार आहे.

# अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेतेपदी निवड

**मुंबई (वृत्तसंस्था)**–अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेतेपदी निवड करण्यात आली आहे. आज देवगिरी बंगल्यावर झालेल्या बैठकीत सर्व आमदारांनी एकमुखाने हा निर्णय घेतल्याची माहिती आहे.दरम्यान मुख्यमंत्रीपदाबाबत अजून अशी काही चर्चा झाली नाही. अजितदादा मुख्यमंत्री व्हावे ही अपेक्षा आहे, पण भाजपचे नेते ठरवतील ते मान्य असेल. काल विजयाचा आनंद आम्ही सगळ्यांनी साजरा केला. सत्ता स्थापनेच्या घडामोडी ४८ तासात पूर्ण होईल, अभूतपूर्व यश राष्ट्रवादी पक्षाला मिळाले. राज्यात नवीन पर्व उदयास आला आहे, असे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी म्हटले आहे.

महायुतीमध्ये भाजपचे १३२ तर शिवसेनेचे ५७ आमदार विजयी झाले आहेत. तर अजित पवारांच्या नेतृत्वात राष्ट्रवादीचे ४१ आमदार विजयी झाले आहेत. यानंतर आज त्यांच्या बंगल्यावर बैठक घेत अजित पवार यांच्यावर गटनेतेपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. दुसरीकडे शिवसेना शिंदेंच्या पक्षाचे आमदार मुंबईत यायला सुरूवात. मुंबईच्या वांद्रे येथील ताज अॅन्ड लॅड्समध्ये आतापर्यंत २९ आमदार उपस्थित असल्याची सूत्रांची माहिती आहे. हॉटेलमध्येच सर्व आमदारांच्या उपस्थितीत गटनेता निवडीची बैठक पार पडणार आहे. ग्रामीण भागातील आमदारांना पोहचायला वेळ लागत असल्याने शिंदे गटाची बैठक सायंकाळी घेण्यात येणार आहे.

अजित पवार यांनी सांगितले की, याची तर



ओळख मी डायरेक्ट... आमच्यावेळी मोदींच्या सभेवेळी हा बाहेर थांबला. आमच्या इथे सगळे आमदार आत, शेवटी याला कोणी आतच घेईना. शेवटी मोदीसाहेब शेजारी बसल्यावर सांगितलं, माझा एक आमदार बाहेर थांबलाय, त्याला ताबडतोब आत घ्यायचा आहे. त्यांनी मागच्या सिक्युरिटीला सांगितलं, अजित पवार कोणाला बोलतात, त्याला आत घ्या. मग आत घेऊन सुनील शेळकेंची सेप्रेट ओळख करून दिली, तोच फोटो त्याने सगळीकडे चालवला. कारण भाजप टोटली विरोधात. सुनील मला आधी म्हणायचा माझी सीट गेली. पण मतदानाच्या दिवशी म्हणाला माझी सीट एक लाखांनी निवडून येणार. माझ्यापेक्षा जास्त मताधिक्याने सुनील शेळके निवडून आला,

## मी महाराष्ट्राच्या जनतेपुढे नतमस्तक

# हा महायुतीच्या एकजुटीचा विजय,आम्ही विरोधकांचा चक्रव्यूह यशस्वीपणे भेदून दाखवला-देवेंद्र फडणवीस

**मुंबई (वृत्तसंस्था)**–आजच्या विजयाने संपूर्ण महाराष्ट्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मागे असल्याचे स्पष्ट झाले. मतदारांनी मोदींचा एक है तो सेफ है चा नारा यशस्वी केला. हा महायुतीच्या एकजुटीचा विजय असून, आम्ही महाराष्ट्राच्या जनतेपुढे नतमस्तक आहोत, अशा शब्दांत भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीच्या दैदिप्यमान विजयावर प्रतिक्रिया दिली आहे.

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत भाजप प्रणित महायुतीचा मोठा विजय झाला आहे. आतापर्यंतच्या मतमोजणीत महायुतीने सर्वाधिक २२५ जागांवर आघाडी घेतली आहे. तर महाविकास आघाडी अवघ्या ५० जागांवर आघाडीवर आहे. देवेंद्र फडणवीस यांनी या विजयावर आनंद व्यक्त करताना हा महायुतीच्या एकजुटीचा विजय असल्याची भावना व्यक्त केली आहे.

देवेंद्र फडणवीस दुपारी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, आजच्या विजयामुळे संपूर्ण महाराष्ट्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मागे असल्याचे स्पष्ट झाले. मोदींनी दिलेला एक है तो सेफ है चा नारा मतदारांनी यशस्वी केला. सर्वांनी एकत्रित मतदान केले. आम्ही आमच्या लाडक्या बहिणींचे विशेष आभार मानतो. त्यांनी आम्हाला मोठा आशीर्वाद दिला.

विरोधकांनी राज्यात फेक नरेटिव्ह तयार केला होता. या नरेटिव्हचा यशस्वी सामना



करणाऱ्या आमच्या राष्ट्रीय विचारांच्या विविध संघटनांचा हा विजय आहे. महाविकास आघाडीने महाराष्ट्रात मतांचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न केला, पण याविरोधात आमच्या विविध पंथांच्या संतांनी जनजागृती केली. हा त्यांचा विजय आहे. खेड्यापाड्यात गावोगावी जाऊन पक्षासाठी घाम गाळणाऱ्या आमच्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा हा विजय आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, रिपाइं नेते रामदास आठवले यांच्यासह सर्वच नेत्यांच्या एकजुटीचा हा विजय आहे. या विजयामध्ये सर्वांचा हातभार आहे. महाराष्ट्राच्या जनतेपुढे आम्ही नतमस्तक आहोत. याहून जास्त काही बोलताच येत नाही. हे प्रेम देणाऱ्या जनतेपुढे आम्ही अक्षरशः साष्टांग दंडवत घालतो. राज्यात झालेल्या विखारी प्रचाराला महाराष्ट्राच्या जनतेने आपल्या कृतीतून उत्तर दिले आहे. आम्ही आधूनिक अभिमन्यू आहोत. आम्ही विरोधकांचा चक्रव्यूह यशस्वीपणे भेदून दाखवला आहे.

आज संपूर्ण महाराष्ट्र पंतप्रधान मोदींच्या पाठिशी असल्याचे सिद्ध झाले आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.कोणत्याही लोकशाहीमध्ये एक चांगला विरोधी पक्ष असणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे विरोधी पक्षांच्या निवडून येणाऱ्या आमदारांचा आम्ही सन्मान करू. त्यांचा आवाज छोटा असो की मोठा असो ते ज्या योग्य गोष्टी सांगतील, त्यांना आम्ही प्रतिसाद देऊ, असे फडणवीस म्हणाले.देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विरोधकांनी ईव्हीएमवर व्यक्त केलेला संशयही फेटाळला. झारखंडमध्ये झामुमोचा विजय झाला. विरोधक तिथे लोकशाहीचा विजय झाल्याचा दावा करतात. पण महाराष्ट्रात पराभव झाल्यानंतर लोकशाही संकटात सापडली आहे, ईव्हीएमशी छेडछाड झाली आहे असे आरोप सुरू आहेत. विरोधकांनी आता आत्मचिंतन करावे. मी त्यांना सल्ला देणार नाही. मी फार छोटा व्यक्ती आहे. पण कधीतरी खरी कारणे काय आहेत याचा विचार करावा लागेल, असे ते म्हणाले.या निवडणुकीत काँग्रेसच्या बाळासाहेब थोरात, पृथ्वीराज चव्हाण यांच्यासारख्या बड्या नेत्यांचा पराभव झाला. देवेंद्र फडणवीस यांनी यावरही भाष्य केले. लोकशाहीची हीच खरी गमंत आहे. लोकशाहीमध्ये जनता कुणाला डोक्यावर घेईल व कुणाला पाडेल हे सांगता येत नाही. या निवडणुकीने हे पुन्हा एकदा दाखवून दिले आहे, असे ते म्हणाले.देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी मुख्यमंत्रपदाच्या उमेदवारावरही भाष्य केले. आमच्यात मुख्यमंत्रीपदावर कोणताही वाद होणार नाही. अमित शहा यांनी पत्रकार परिषदेत स्पष्टपणे सांगितले आहे. मुख्यमंत्रीपद हे कोणत्याही निकषावर नाही. मुख्यमंत्रीपदाचा निर्णय तिन्ही पक्षांचे नेते एकत्र येऊन घेतील. या प्रकरणी एकनाथ शिंदे, अजित पवार व आमच्या पक्षाचे नेते जे काही निर्णय घेतील ते आम्हाला मान्य असेल, असे ते म्हणाले.देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी मराठा आरक्षणाच्या आंदोलनानंतरही विदर्भ व मराठवाड्यात भाजपला मिळालेल्या यशावरही भाष्य केले. ते म्हणाले, माझ्या मते तुम्ही वारंवार एक व्यक्ती व एका पक्षाला टार्गेट करता, त्यातून तुमची हवा निघून जाते, त्याची तीव्रता कमी होते व लोकांना त्याचे सत्य समजते. त्यानंतर लोकांच्या मनात त्याची सहानुभूती निर्माण होते. या निवडणुकीत हेच सिद्ध झाले, असे ते म्हणाले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mhatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077